www.lokrakshanay.com

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

# लोकरक्षणाय

• LOKRAKSHANAY • RNI TC NO. MAHBIL10469

•Editor- Rakesh Shankar Gore •Daily •Thane •Volume-01, Issue-208 • Tuesday, 02 January 2024 •Pages-04 •Rs.2/-

### अनमोल विचार

"योग्य वेळेची वाट पाहणे थांबवा कारण योग्य वेळ कधीच येत नाही !!"

## लक्षवेधी

### अमित शाह घेणार उच्चस्तरीय सुरक्षा आढावा बैठक

**नवी दिल्ली :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी उद्या राष्ट्रीय राजधानी नवी दिल्लीत जम्मू आणि काश्मीरबाबत उच्चस्तरीय सुरक्षा आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती आणि सुरक्षा ग्रीड आणि शून्य दहशतवादी योजना यासारख्या मुद्द्यांवर चर्चा केली जाईल. अमित शाह या बैठकीत सुरक्षा ग्रीडचे कार्य आणि सुरक्षा तसेच केंद्रशासित प्रदेशातील विकास उपक्रमांशी संबंधित विविध कामांचा आढावा घेतील. तसेच एरिया डोमिनेशन प्लॅन, झिरो टेरर प्लॅन, कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती, वअढअ आणि इतर सुरक्षेशी संबंधित मुद्द्यांचा देखील अमित शाह आढावा घेणार असल्याची माहिती मिळत आहे.

### तीन नवीन गुन्हेगारी कायद्यांविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका

**नवी दिल्ली :** आयपीसी, सीआरपीसी आणि इव्हिडन्स ॲक्ट हे ब्रिटिशकालीन फौजदारी कायदे बदलण्यात येणार असून त्या जागी तीन नवीन फौजदारी कायदे लागू करण्यात आले आहेत. पण, या नवीन कायद्यांविरोधात सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. विशाल तिवारी यांनी ही याचिका दाखल करून या नवीन कायद्यांवर बंदी घालण्याची मागणी केली आहे. हे कायदे जेव्हा विधेयक स्वरुपात होते, तेव्हा त्यावर कोणतीही चर्चा झाली नाही. संसदेत चर्चेशिवायच हे कायदे मंजूर करण्यात आले. तसंच, या कायद्यात अटकेचा कालावधी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरुद्ध आहे. त्याखेरीज संपत्ती गोठण्यापासून संरक्षण आणि इलेक्ट्रॉनिक पुराव्यांच्या स्वीकारासाठी प्रावधान बनवण्यात आलेलं नाही, असंही याचिकेत म्हटलं आहे.

### गुजरातमध्ये सूर्यनमस्काराचा 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'; मोदींकडून अभिनंदन अन् सल्ला

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः योगासने आणि सूर्यनमस्कार करुन शारिरीक तंदुरुस्त जपतात. मोदींच्या प्रयत्नातूनच जगभरात भारतीय योगाभ्यास आणि योगासने पोहोचली. त्यामुळेच, जागतिक योग दिनही साजरा होऊ लागला. भारतीय संस्कृती आणि परंपरेत योगासने आणि योगविद्येला अधिक महत्त्व आहे. त्यात, सूर्यनमस्काराचेही विशेष महत्व आहे. याच सूर्यनमस्काराच्या सामूहिक कृतीतून गुजरातने आज गिनीज बुक ऑफ वर्ल्डमध्ये आपलं नावं केलंय. एकाचवेळी १०८ ठिकाणी हा सूर्यनमस्कार घालण्यात आला. नववर्षाच्या पहिल्याच दिवशी हा विक्रम गुजरातने केला आहे. गुजरातमध्ये सर्वाधिक लोकांनी एकाच वेळी १०८ ठिकाणांवर सूर्यनमस्कार करण्याचा जागतिक विक्रम केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे अभिनंदन केले. सूर्यनमस्काराचे नानाविध फायदे असल्यामुळे प्रत्येकाने सूर्यनमस्काराला आपल्या दैनंदिन दिनचर्येचा भाग बनवावा, असे आवाहनही मोदींनी केले.

### विदर्भासह 'या' भागात कोसळणार मुसळधार पाऊस; हवामान विभागाचा इशारा

**नवी दिल्ली :** देशाच्या बहुतेक भागात सध्या हवामान झपाट्याने बदलताना दिसत आहे. या बदलत्या हवामानामुळे काही भागात पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार महाराष्ट्रातील विदर्भ , मध्य महाराष्ट्रसह देशातील इतर भागात हलका ते मुसळधार पाऊस पुढील दोन ते तीन दिवसात होण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे राजस्थान, मध्य प्रदेश आणि बिहारमध्ये कडाक्याच्या थंडीमुळे लोकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. भारतीय हवामान विभागानेदिलेल्या माहितीनुसार पुणे आणि कोकणात बुधवारपासून पावसाची शक्यता आहे. तर गुरुवारपासून हलक्या स्वरूपाचा पाऊस मध्य महाराष्ट्रात पडू शकतो. हा पाऊस उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यामुळे पडू शकते. हवामान विभागाने कोकण आणि मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात ढगाळ हवामानाचा अंदाज वर्तवला आहे.

### गँगस्टर गोल्डी ब्रार दहशतवादी म्हणून घोषित; केंद्र सरकारची UAPA अंतर्गत कारवाई

**नवी दिल्ली :** गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचा फरार सहकारी गँगस्टर गोल्डी ब्रार याला भारत सरकारने बेकायदेशीर क्रियाकलाप (प्रतिबंध) कायदा अंतर्गत दहशतवादी घोषित केले आहे. याआधी केंद्र सरकारने लखबीर सिंग लांडा यालाही दहशतवादी घोषित केले असून, हे दोघेही कॅनडामध्ये लपले आहेत. गोल्डी ब्रार हा पंजाबी गायक सिद्धू मूसवाला खून प्रकरणातील मास्टरमाईंड आहे. गृह मंत्रालयाने जारी केलेल्या नोटीसमध्ये गोल्डी ब्रार प्रतिबंधित खलिस्तानी संघटना बब्बर खालसा इंटरनॅशनलशी संबंधित असल्याचे म्हटले आहे. पंजाबमधील खंडणी आणि सीमेपलीकडून शस्त्रास्त्र आणि अमली पदार्थांच्या तस्करीतही त्यांचा सहभाग आहे.

### श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टच्या नावाने केली जात आहे फसवणूक! : विहिंपची पोलिसांकडे तक्रार

**उत्तरप्रदेश :** श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टच्या नावावर क्यू आर कोडच्या माध्यमातून अनेकांची फसवणूक करण्यात आल्याची तक्रार विश्व हिंदु परिषदेने उत्तरप्रदेश पोलिसांकडे केली आहे. विहिंपचे राष्ट्रीय प्रवक्ते विनोद बन्सल म्हणाले की, काही लोक श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टच्या नावावर कोणतीही मान्यता न घेता पैसे मागत आहेत. राज्याचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि केंद्रीय गृहमंत्रालय यांच्याकडे या संदर्भात तक्रार करण्यात आली असून त्यांच्यावर तातडीने कारवाई करण्याची विनंती करण्यात आली आहे. लोकांना क्यू आर कोड पाठवून आणि त्याद्वारे पैसे घेऊन लोकांची फसवणूक केली जात आहे.

# परदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**बाळासाहेबांसाठी मोठी श्रद्धांजली**

येत्या २२ जानेवारीला अयोध्येमध्ये राम मंदिर सकारले जात आहे. यामुळे दिवंगत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि दिवंगत आनंद दिघे यांच्यासह करोडो रामभक्तांचे स्वप्न सकार होत आहे. विशेष म्हणजे बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला अयोध्येतील राम मंदिराचे लोकार्पण होत आहे. ही खरी बाळासाहेबांना श्रद्धांजली ठरेल, असेही मतही मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केले.

**निव्वळ स्वच्छता मिशन**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१५ मध्ये स्वच्छ भारत अभियान सुरू केले. पंतप्रधान मोदी यांनी स्वत: हातात झाडू घेऊन अभियानाला सुरूवात केली. त्यावेळेस काही लोकांनी त्यांच्यावर टिका केली. हे केवळ फोटो काढण्यासाठी अभियान असल्याचे म्हटले होते. पण, आता ती लोकचळवळ झाली आहे. तसेच मुंबईसह महाराष्ट्रात सध्या स्वच्छता अभियान राबविले जात आहे. त्यावरून काही लोक माझ्यावर टिका करीत आहेत. पण, त्यांना सगळ्यांना सांगतो की, तुम्ही टिका करत रहा मी मात्र काम करीत राहील, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. तसेच हे अभियान फोटोसेशन नाही तर, निव्वळ स्वच्छता मिशन आहे, असे प्रतिउत्तरही त्यांनी विरोधकांना यावेळी दिले.




**■ठाणे। यश सावंत,**

परदेशी गुंतवणुकीत राज्याने कर्नाटक आणि गुजरात राज्याला मागे टाकून पुन्हा पहिला क्रमांक मिळवला आहे. अनेक उद्योजक आपला व्यवसाय सुरू करण्यासाठी आजही महाराष्ट्राला पहिली पसंती देत आहेत. गतवर्षी दाओसमध्ये १ लाख ३७ हजार कोटींचे करार केले गेलेले असून त्यातील ८५ टक्के करारानुसार काम सुरू झाले आहे, असा दावा करत यंदाही राज्यात विक्रमी गुंतवणूक घेऊन येऊ असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी रात्री ठाण्यात व्यक्त केला. केंद्रात आणि राज्यात डबल इंजिनचे सरकार अस्तित्वात आल्यामुळे राज्याचा वेगवान विकास करणे शक्य होत आहे. सर्वाधिक विकासप्रकल्प हे महाराष्ट्रात सुरू असून आगामी वर्ष देखील महाराष्ट्राचेच असेल, असा आशावादही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

शिवसेना ठाणे शहर शाखा आणि रक्तानंद ग्रुप महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने ठाणे शहरात रविवार, ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री रक्तदान शिबिर आणि राज्यस्तरीय रक्तकर्ण पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थिती लावून रक्तदान केले. यानंतर त्यांनी उपस्थितीतांशी संवाद साधला. शिवसेनेचे दिवंगत ठाणे जिल्हा प्रमुख आनंद दिघे यांनी सुरु केलेला हा उपक्रम गेली २९ वर्षे अव्याहतपणे सुरू आहे. रक्तदान हे श्रेष्ठदान आहे असे आपण म्हणतो, रक्तदान शिबीरे आणि शिवसेनेचे अतूट असे नाते आहे. ज्यावेळी रक्ताचा तुटवडा जाणवला, त्यावेळी शिवसैनिक कायमच मदतीसाठी पुढे धावून आला आहे. नवीन वर्षाचे स्वागत करताना अनेक तरुणांनी स्वतःहून पुढे येऊन रक्तदान केले याचे विशेष समाधान वाटते, असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. मुंबईसह महाराष्ट्रात सध्या स्वच्छता अभियान राबविले जात आहे. मुंबई स्वच्छ, हरित आणि सुंदर केली जात आहे.

## '22 जानेवारीला सार्वजनिक सुट्टी जाहीर करा', मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी



**■मुंबई। दिगंबर जाधव,**

गेले कित्येक वर्ष ज्याची सर्वांना आतुरता होती, अशा अयोध्येतील राम मंदिराचं येत्या 22 जानेवारीला उद्घाटन होणार आहे. या दिवशी देशभरात दिवाळ साजरी केली जावी, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. याच पार्श्वभूमीवर भाजप आमदार अतुल भातखळकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून मोठी मागणी केली आहे.

येत्या 22 जानेवारीला राज्यात सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी, अशी मागणी कांदिवली पूर्व विधानसभेचे आमदार अतुल भातखळकर यांनी केली आहे. अयोध्येत श्रीरामांची प्रतिष्ठापना होणार आहे, हा ऐतिहासिक क्षण पाहण्यासाठी लोकांना सार्वजनिक सुट्टी जाहीर करा, असं भातखळकरांनी पत्रात म्हटलंय.

**काय लिहिलंय पत्रात?**

महोदय, उपरोक्त विषयास अनुसरून शतकानुशतकांच्या संघर्षानंतर प्रभू श्री राम जन्मभूमी आयोध्येमध्ये उभारण्यात आलेल्या भव्य अशा श्री राम मंदिरात सोमवार, २२ जानेवारी रोजी रामलला विराजमान होणार आहेत. सर्वच भारतीयांसाठी हा महत्वाचा आणि अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यादिवशी सर्वत्र दिवाळी साजरी होणार आहे.

## जागावाटपापेक्षा भाजपला पराभूत करणे महत्वाचे; उद्धव ठाकरे यांची भूमिका : सूत्र



**■मुंबई। विशाल कारंडे,**

महाविकास आघाडीत जागावाटपावरुन रस्सीखेच सुरु असल्याचं चित्र सध्या दिसत आहे. मात्र जागावाटपापेक्षा भाजपला पराभूत करणे महत्त्वाचे आहे, असं उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस पक्षश्रेष्ठींना सांगितल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. जागावाटपावरुन सुरु असलेल्या चर्चांवर उद्धव ठाकरे आणि काँग्रेस पक्षश्रेष्ठींमध्ये फोनवरुन चर्चा झाल्याची माहिती समोर येत आहे. जागावाटपाबाबत कुठलेही मतभेद नाहीत. भाजपविरोधात एकत्रित लढायचं आहे. जागावाटपापेक्षा भाजपला पराभूत करणे महत्वाचे, अशी भूमिका उद्धव ठाकरे यांनी घेतल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. उद्धव ठाकरे लवकरच दिल्ली दौरा करण्याची शक्यता आहे. शिवसेना ठाकरे गट आणि वंचित बहुजन आघाडीची आधीच युती झाली आहे. आता प्रकाश आंबेडकर यांना महाविकास आघाडीत सामील करुन घेण्यासाठी प्रयत्न सुरु आहे. प्रकाश आंबेडकर यांच्यासोबत चर्चा देखील सुरु असून लवकर ते महाविकास आघाडीत सामील होतील, असं महाविकास आघाडीचे नेते सांगत आहे.

## जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला; सुप्रिया सुळे यांनी स्पष्टच सांगितलं..

**■मुंबई। सचिन कदम,**



आगामी लोकसभा निवडणुकीसाठी सगळ्याच राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली असून जागावाटपाबाबत दावे- प्रतिदावे केले जात आहेत. आघाड्यांमधील घटक पक्षांची यासंदर्भात बोलणीही सुरू झाली आहे. राज्यातील उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने तर अगोदरच २३ जागांवर दावा केला आहे. त्यावर अगोदर काँग्रेस पक्षाने प्रतिक्रिया दिल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार गटाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनीही आता भाष्य केले आहे. पंधरा दिवसांपूर्वी दिल्लीत सोनिया गांधी, उध्दव ठाकरे आणि शरद पवार यांची बैठक झाली होती. त्या बैठकीत जागांच्या संदर्भात बऱ्याच बाबी स्पष्ट झाल्या आहेत. येत्या आठ ते दहा दिवसांत तुमच्यापर्यंत सगळी माहिती येईल असे सुळे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. राज्याच्या राजकारणात महाआघाडी आणि महायुती असे दोन गट पडले आहेत. राज्यात लोकसभेच्या ४८ जागा आहेत. महायुतीत भारतीय जनता पार्टी, शिवसेना (एकनाथ शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांचा समावेश आहे.

## केंद्र सरकारच्या नव्या कायद्याने ट्रकचालक आक्रमक; नवी मुंबईत पोलिसांना जबर मारहाण



**■नवी मुंबई। भावना जैन,**

केंद्र सरकारने मोटार वाहन कायद्यात केलेल्या सुधारणांमुळे वाहतूक व्यावसायिक संतप्त झाले आहेत. देशभरात या कायद्याला विरोध दर्शवला जात आहे. त्यामुळे ट्रक चालकांनी दुरुस्तीला विरोध करत देशभरात संप पुकारला आहे. नवी मुंबईतही या कायद्याच्या विरोधात वाहन चालक रस्त्यावर उतरले आहेत. मात्र या आंदोलनाला नवी मुंबईत गालबोट लागलं आहे. उरण जेएनपीटी मार्गावर आंदोलन करणाऱ्या ट्रकचालकांनी पोलिसांना दगडाने आणि बांबूने मारहाण केली आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून मोटार वाहन कायदा पारीत केल्याने राज्यात मोठा वाद सुरु झाला आहे. या विरोधात अवजड वाहतूक करणारे ट्रक चालक रस्त्यावर उतरले आहेत. उरण जेएनपीटी मार्गावरही ट्रक चालकांनी रास्ता रोको करत आंदोलन सुरु केले आहे. मात्र यावेळी पोलिसांनी त्यांना हटवण्याचा प्रयत्न केला असता संतप्त चालकांनी पोलिसांना मारहाण केल्याचा प्रकार समोर आला आहे. आंदोलक ट्रक चालकांनी यावेळी गाड्यांवर दगडफेक करत तोडफोड केली आहे.

## 'मराठा आरक्षणाबाबत तारखांवर तारखा देऊन चालढकल करणे कुणालाही परवडणार नाही,' संभाजीराजेंचा इशारा



**■मुंबई। अनिकेत भंकाळ,**

मराठा समाजाला ओबीसींच्या कोट्यातून आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत येऊन उपोषण आणि आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे नववर्षाच्या पहिल्याच महिन्यात मराठा आरक्षणाचा प्रश्न पेटण्याची शक्यता आहे.

त्याचदरम्यान गेल्या अनेक वर्षांपासून मराठा आरक्षणाबाबत आग्रही राहिलेल्या संभाजीराजे छत्रपती यांनी टिकणारे आरक्षण म्हणजे नेमके काय? असा प्रश्न उपस्थित करत मराठा आरक्षणाबाबत केवळ तारखांवर तारखा देऊन चालढकल करणे आता कुणालाही परवडणार नाही, असा इशारा दिला आहे.

संभाजीराजे छत्रपती सोशल मीडियावर केलेल्या एका पोस्टमध्ये म्हणाले की, २०२३ हे वर्ष संघर्षाचे होते. आरक्षणासाठी अनेक मराठा तरूणांनी आत्महत्या केल्या. मात्र अजूनही राज्यकर्ते समाजाची दिशाभूल करत आहेत का, असा प्रश्न पडतो. सरकार म्हणते कुणाच्याही आरक्षणाला धक्का न लावता टिकणारे आरक्षण देणार. कुणाला धक्का न लावता देणार याचा अर्थ ५०% च्या वर देणार, पण यापूर्वी दोनदा असे आरक्षण टिकलेले नाही, मग नेमके आरक्षण देणार कसे ? टिकणारे आरक्षण म्हणजे नेमके काय ? हे सरकारने स्पष्ट करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

तसेच किमान येत्या वर्षाच्या सुरूवातीला तरी आपल्या संघर्षाला यश मिळेल अशी अपेक्षा मराठा समाज बाळगून आहे. त्यामुळे केवळ तारखांवर तारखा देऊन चालढकल करणे आता कुणालाही परवडणार नाही, असा इशाराही संभाजीराजे छत्रपती यांनी दिला आहे.

## मोदी सरकारने आधुनिक तंत्रज्ञानाचा शस्त्रासारखा वापर करू नये! काँग्रेसची जोरदार टीका

**■नवी दिल्ली।प्रगती शर्मा,**

मनरेगा पेमेंटसाठी आधार-आधारित प्रणाली अनिवार्य करण्यात आली आहे. त्यावर काँग्रेसने जोरदार टीका केली आहे. त्यांनी म्हटले आहे की सरकारने गरीबांना त्यांचा हक्क डावलण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा शस्त्रासारखा वापर करणे त्वरीत थांबवले पाहिजे. पंतप्रधान मोदींनी पहिल्यापासूनच मनरेगा योजनेचा तिरस्कार केला आहे. त्यासाठीच त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गरीबांना त्यांचा हक्क डावलण्याचा प्रकार केला आहे. एका निवेदनात काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी म्हटले आहे की, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्यासाठी (मनरेगा) आधारद्वारे देयके अनिवार्य करण्यासाठी ग्रामीण विकास मंत्रालयाने मुदत पुन्हा वाढवली आहे. एकूण २५.६९ कोटी मनरेगा कामगार असून त्यापैकी १४.३३ कोटी सक्रिय कामगार मानले जातात. २७ डिसेंबरपर्यंत एकूण नोंदणीकृत कामगारांपैकी ३४.८ टक्के (४.९ कोटी) आणि १२.७ टक्के सक्रिय कामगार (१.८ कोटी) अजूनही आधार आधारित जोडणी नसल्याने अपात्र ठरले आहेत.

मनरेगा साठी अशा प्रकारची प्रणाली अवलंबणे गरीब मजुरांवर अन्यायकारक असल्याची बाब कामगार, अभ्यासक आणि संशोधकांनी अधोरेखित केली असूनही, मोदी सरकारने आपले 'तंत्रज्ञानाचे विनाशकारी प्रयोग' सुरूच ठेवले आहेत. कोट्यवधी गरीब आणि उपेक्षित भारतीयांना मूलभूत उत्पन्नापासून दूर ठेवण्यासाठी पंतप्रधानांची नवीन वर्षाची ही क्रूर भेट दिली आहे, असा आरोप त्यांनी केला.

## 'हिट अँड रन' कायद्याचा वाद: काँग्रेसने घेतली वाहनचालकांची बाजू, नाना पटोलेंनी केली महत्त्वाची मागणी



**■मुंबई। विशाल पाटील,**

केंद्रातील मोदी सरकारने आणलेला नवीन मोटार वाहन कायदा हा वाहन चालकांसाठी अत्यंत कठोर व जुलमी आहे. या काळ्या कायद्यानुसार अपघात झाल्यास ट्रक चालकास दहा वर्षांची शिक्षा तसेच सात लाख रुपयांचा दंड भरावा लागणार आहे. या काळ्या कायद्याविरोधात वाहन चालकांमध्ये तीव्र संताप असून टँकरचालकांनी संप पुकारला आहे. या संपाला काँग्रेसचा पाठिंबा आहे. वाहन चालकांवर अन्याय करणारा जुलमी, अत्याचारी नवीन मोटार वाहन कायदा रद्द करावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. टिळक भवन येथे त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. 'दुचाकी वाहन, टॅक्टर चालवण्यासही चालकांना भिती वाटावी असा जुलमी, कठोर व अत्याचारी मोटर वाहन कायदा मोदी सरकारने आणला आहे. या कायद्यामुळे स्वताचे वाहन चालवण्यासही लोकांना भिती वाटत आहे. आधीच्या कायद्यानुसार अपघात झाला तर १-२ वर्षांची शिक्षा व १ हजार रुपयांचा दंड होता पण नवीन कायद्यानुसार १० वर्षांपर्यंत शिक्षा व ७ ते १० लाख रुपये दंडाची तरतूद आहे तसेच हा कायदा आता अजामिनपात्र आहे. या कठोर काळ्या कायद्याविरोधात जनतेत जीव्र नाराजी आहे. हा काळा कायदा मंजूर करून घेण्यासाठीच मोदी सरकारने विरोधी पक्षांच्या १४६ खासदारांना निलंबित केले. या काळ्या कायद्याला काँग्रेस पक्षाचा विरोध असून चालकांनी पुकारलेल्या संपाला पाठिंबा आहे,' असे पटोले म्हणाले.

## मराठ्यांना आरक्षण मिळालं की अयोध्येला नक्की जाऊ, 22 जानेवारीला रस्त्यात आनंद साजरा करू, मनोज जरांगेंचा निर्धार



**■जालना। अंतरवाली सराटी,**

मराठ्यांना आरक्षण मिळाल्यानंतर अयोध्येला नक्की जाऊ. तोपर्यंत 22 जानेवारीला आम्ही रस्त्यानं चालताना राम मंदिराचा आनंद साजरा करु, असं मनोज जरांगे यांनी म्हटलं. तसेच 20 तारखेपर्यंत राज्य सरकारला चर्चेसाठी दारं खुली आहेत, पण त्यानंतर कोणतीही चर्चा करणार नाही, असा थेट इशारा देखील यावेळी मनोज जरांगेंनी दिलाय. येत्या 20 जानेवारी मनोज जरांगे हे मुंबईच्या दिशेने कूच करतील. तसेच मुंबईत उपोषणाची हाक देखील त्यांनी दिलीये. आंदोलनात हसू होईल असं कृत्य एकाही मराठ्याने आंदोलनात करू नये, फक्त शांत होऊन आंदोलनात बसा असं आवाहन देखील मनोज जरांगे यांनी यावेळी केलंय. त्याचप्रमाणे जर आम्हाला अडवलं तर मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या मुंबई आणि मतदारसंघातील दारात जाऊन बसणार असल्याचा इशारा मनोज जरांगे पाटलांनी दिलाय.


**बैठकीला जाणार नाही – मनोज जरांगे**

शंभुराज देसाई यांनी मंगळवार 2 जानेवारी रोजी मुंबईत होणाऱ्या बैठकीसाठी मनोज जरांगे यांना पत्र पाठवले आहे. यावर त्यांनी म्हटलं की, शंभुराज देसाई यांनी मला पत्र पाठवून उद्या मुंबईत होणाऱ्या आरक्षणासंदर्भातल्या बैठकांना बोलावलं आहे. पण मी या बैठकांना जाणार नाही. उद्या 4ते 5 मॅरेथॉन बैठका मुंबईत होणार आहेत. तसेच ओबीसीतूनच मराठ्यांना सरसकट आरक्षण द्या अशी मागणी आम्ही मुख्यमंत्र्यांच्या ओएसडीकडे केलीये.

# धारावी पुनर्विकास प्रकल्पात जगप्रसिद्ध आरेखक अन् नियोजकांचा सहभाग; धारावी मास्टर प्लॅनची संकल्पना सादर करणार

**मुंबई। प्रतिनिधी,**
धारावी पुनर्विकास प्रकल्प प्रायव्हेट लिमिटेड (DRPPL)ने जगप्रसिद्ध शहर आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील नियोजनकार आणि तज्ज्ञांना आपल्या महत्त्वाकांक्षी धारावी पुनर्विकास प्रकल्पात सहभागी करून आशियातील सर्वात मोठ्या आणि सर्वात चैतन्यशील वसाहतीच्या पुनर्कल्पनेत मोठी झेप घेतली आहे.

डीआरपीपीएल प्रसिद्ध वास्तुविशारद हाफीज कॉन्ट्रॅक्टर तसेच सासाकी ही रचनाकार फर्म आणि बुरो हॅपोल्ड या सल्लागार कंपनीबरोबर भागीदारी करीत आहे. याशिवाय सिंगापूरमधील तज्ज्ञदेखील



या प्रकल्पात सहभागी झाले आहेत. हे सर्व धारावीच्या रहिवाशांसाठी जागतिक दर्जाचे शहर बनवण्याच्या दिशेने काम करतील. मुंबईतील क्रांतिकारी सामाजिक गृहनिर्माण आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (रफ्म) प्रकल्पांसाठी प्रसिद्ध असलेले हाफीज कॉन्ट्रॅक्टर यांच्या सहभागामुळे डीआरपीपीएलची सामाजिक जबाबदारी आणि नावीन्यपूर्ण रचनेसाठी दृढ वचनबद्धता प्रतिबिंबित होत आहे. डीआरपीपीएलने अमेरिकेतील सासाकी ही प्रसिद्ध आंतरशाखीय रचना फर्म आणि बुरो हॅपोल्ड ही ब्रिटनमधील प्रसिद्ध सल्लागार कंपनी यांनाही आपल्याबरोबर घेतले आहे. या दोन्ही कंपन्या शहर नियोजन आणि पायाभूत अभियांत्रिकीसाठी विख्यात आहेत. सासाकी कंपनीला ७० वर्षांचा वारसा असून, कामाच्या ठिकाणी उत्साही वातावरण राहील, अशी शाश्वत रचना तयार करण्यासाठी त्यांची जागतिक स्तरावर ओळख आहे. तर बुरो हॅपोल्ड शहरांची पर्यावरणीय आणि सामाजिक ओळख अबाधित ठेवून तेथे सर्जनशील आणि मूल्याधारित पायाभूत सुविधांचा आराखडा तयार करण्यासाठी प्रसिद्ध आहेत. वर्ष १९६९ मध्ये स्थापन झालेल्या सिंगापूर गृहविकास मंडळाने १२ लाख घरांची चोखंदळपणे उभारणी करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यातून जागतिक दर्जाच्या एकात्मिक पायाभूत सुविधा आणि एका प्रगतशील समाजाची निर्मिती झाली. या प्रवासातून मिळालेल्या अनमोल कौशल्य व अनुभवांचा उपयोग करून त्यांचा समावेश आपल्या परिवर्तनीय प्रक्रियेत करण्याचे धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी सिंगापूर हे प्रेरणादायी उदाहरण आहे. आजच्या धारावीसारख्याच झोपड्या, झोपडपट्ट्या आणि वस्ती असे १९६०च्या दशकात सिंगापूरचे चित्र होते.

# खेळताना अचानक उलट्या, मग बेशुद्ध पडली, चार वर्षीय चिमुकलीचा उपचार दरम्यान मृत्यू

**रत्नागिरी। प्रतिनिधी,**
लहान मुलांवर बाहेर खेळत असतानाही लक्ष ठेवावे लागते. लहान मुलांकडून अनावधानाने खातापिताना घडलेली एखादी चूकही थेट जीवावरती बेतू शकते. असाच काहीसा प्रकार रत्नागिरी शहरात घडला असून अचानक उलट्या होऊ लागल्याने रुग्णालयात दाखल केलेल्या चार वर्षीय चिमुकलीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. रीया जगन्नाथ कुमार असं या चार वर्षांच्या चिमुकलीचे नाव आहे. मात्र, हा मृत्यू अद्याप नेमका कोणत्या कारणामुळे झाला आहे समजू शकलेले नाही. रत्नागिरी शहरातील कुवारबाव परिसराजवळ शांतीनगर रसाळवाडी



येथे दोन सख्ख्या बहिणी अंगणात खेळत होत्या. यातील एक चार वर्षांची रिया अचानक घरात आली आणि तिने घरी येऊन उलट्या केल्या. त्यानंतर ती बेशुद्ध पडली. यावेळी तिची आई कपडे धुत होती, तिला बघून घरचे घाबरून गेले. यावेळी शेजारी राहणारे सुयोग रसाळ हे या कुटुंबाच्या मदतीला धावले. त्यांच्या खाजगी वाहनाने तात्काळ तिला रत्नागिरी जिल्हा सिव्हिल रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिची प्रकृती गंभीर स्वरूपात अत्यवस्थ झाल्याने तिला तात्काळ जिल्हा रुग्णालयातील आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले होते. यावेळी तिच्यावरती उपचार सुरू असतानाच तिचा दुर्दैवाने मृत्यू झाला. ३१ डिसेंबर रोजी रविवारी सायंकाळी साडे पाचच्या दरम्यान तिचा मृत्यू झाला. रत्नागिरी रसाळवाडी येथील शांतीनगर परिसरात हे कुटुंब प्रकाश झोरे यांचेकडे भाड्याने राहते. या चिमुकलीच्या मृत्यूने परिसरात हळहळव्यक्त केली जात आहे. मात्र, या चिमुकलीच्या मृत्यूचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. शवविच्छेदन अहवाल डॉक्टरांनी राखून ठेवला असून व्हिसेरा तपासणीसाठी पाठवण्यात आला आहे.

# नागपुरात स्वतंत्र विदर्भ राज्यासाठी 'रास्तो रोको' आंदोलन, शहरात वाहतूक कोंडी

**नागपूर। प्रतिनिधी,**
स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीसाठी विदर्भ राज्य आंदोलन समितीने गेल्या सहा दिवसांपासून नागपुरातील संविधान चौकात उपोषण सुरू केले. सोमवारी आंदोलनाची सांगता झाली आणि यावेळी झालेल्या सभेनंतर विदर्भवाद्यांनी संविधान चौकात रस्त्यावर येऊन ठिय्या दिला. त्यामुळे नागपूर शहरातील वाहतूक व्यवस्था सुमारे ४० मिनिटे विस्कळीत झाली. माजी आमदार ऍड. वामन चटप यांच्या नेतृत्वाखाली विदर्भ राज्याच्या मागणीसाठी २७ डिसेंबर २०२३ पासून उपषोण आंदोलन करण्यात



आले. या आंदोलनाची सांगता सोमवारी सायंकाळी झाली. यावेळी विदर्भातील वेगवेगळ्या जिल्ह्यातून आलेल्या कार्यकर्ते उपस्थित होते. उपोषण आंदोलनाची दखल केंद्र सरकारने घेतली नाही . त्यामुळे आंदोलनकर्ते संतापले. सभेदरम्यान वक्त्यांनी विदर्भावरील अन्यायाचा पाढा वाचला तसेच महाराष्ट्रात राहून विदर्भाचा मागासलेपण दूर होणार नाही, असे सांगितले. तसेच येथील आर्थिक, आरोग्य आणि नोकरी यातील अनुशेष कोणतेही सरकार आले तरी भरून काढू शकत नाही. विदर्भात वनसंपदा, खनिज संपत्ती, सुपिक जमीन आणि वीज निर्मितीमध्ये श्रीमंत आहे. पण, विदर्भात सिंचनाच्या सोयी नाही आणि त्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहे. विदर्भाचा विकास राज्यकर्ते करण्यास अपयशी ठरले आहे. यापुढे स्थिती बदल होणे शक्य नाही. विदर्भातील शेतकरी, युवक, उद्योजक, व्यापारी या सर्व घटकांच्या भले होण्यासाठी विदर्भ राज्याशिवाय पर्याय नाही, असे ऍड. वामन चटप म्हणाले.

नेत्यांची भाषणे झाल्यावर आंदोलकांनी रस्त्यावर येऊन आंदोलन केले. त्यामुळे सुमारे ४० मिनिटे वाहतूक ठप्प झाली होती. या भागात वाहनांच्या मोठ्या रांगल्या होत्या.

# किरकोळ भांडणावरून चुलत मामाकडून भाच्याचा खून, आरोपीने यापूर्वी केला होता पत्नीचा खून



**डहाणू। प्रतिनिधी,**
मुलगा, पुतण्या आणि भाच्यामध्ये झालेल्या किरकोळ वादात चुलत मामाने भाच्याचा खून केल्याची धक्कादायक घटना तलासरी तालुक्यात घडली आहे. याप्रकरणी तलासरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. यातील मुख्य आरोपीने यापूर्वी आपल्या पत्नीच्या खुनाच्या गुन्ह्यात कारावास भोगला असून त्याने भाच्याचा खून अगदी शिताफीने केल्याचे समोर आले आहे.

तलासरी तालुक्यातील झरी फोंडा पाडा येथील देवराम रघ्या जवलिया ३० हा आपल्या वडिलांसह मुंबई येथे मासेमारी बोटीवर काम करत असून काही दिवसांसाठी आपल्या घरी आला होता. दरम्यान चुलत मामाची मुले प्रदीप खरपडे ३१ आणि विकास खरपडे वय २३ यांच्यासह शनिवारी दुपारी ३ वाजता घरातून बाहेर गेला असून रात्री ८ वाजता घरी परतला. त्यांनतर देवराम याने वाहन जोरात चालवल्याच्या मुद्द्यावरून तिघांमध्ये वाद होऊन झटापटी सुरू होती. दरम्यान प्रदीपचे वडील चंदू खरपडे ५३ याने मागून येऊन देवरामच्या मानेवर चाकूने वार केला. याविषयी आरडाओरडा झाल्यानंतर परिसरातील लोकांनी जखमीला तलासरी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी देवरामला मयत घोषित केले. याविषयी तलासरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी रात्री उशिरा जंगलात पळून गेलेल्या चंदू खरपडे या सराईत गुन्हेगारासह दोघांना ताब्यात घेतले असून त्यांना रविवारी न्यायालयासमोर हजर केले असता. त्यांना चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# महापालिकेकडून गरजूंना मदतीचा हात

**वाशी। प्रतिनिधी,**
विविध समाज घटकांच्या सक्षमीकरणासाठी नवी मुंबई महापालिकेच्या समाजविकास विभागामार्फत विविध लोककल्याणकारी योजना राबवण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत नवी मुंबई महापालिकेने विद्यार्थी, विधवा घटस्फोटीत महिला, सफाई कामगार व त्यांच्या मुलांना, विधवा महिला, आंतरजातीय विवाहाकरीता प्रोत्साहनात्मक अनुदानातून गरजूंना मदतीचा हात दिला आहे. नवी मुंबई महापालिकेकडून पालिका क्षेत्रातील एप्रिल महिन्यापासून डिसेंबरपर्यंत निराधार विधवा घटस्फोटीत अशा ६६ महिलांना अनुदान दिले आहे. त्याचप्रमाणे विधवा घटस्फोटीत महिलांच्या मुलांना शिष्यवृत्तीसाठी १ हजार १३७ विद्यार्थ्यांना अनुदान दिले आहे. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांतील शाळेत जाणाऱ्या १८ हजार २२७ विद्यार्थ्यांना अनुदान दिलेले आहे. तसेच घरातील कर्त्या पुरुषांचे निधन झालेल्या १८९ महिलांना अनुदान देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील दुर्धर आजार असणाऱ्या १६ महिलांना मदतीचा हात देण्यात आला आहे. तर आंतरजातीय विवाहासाठी ३१ जणांना प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे निराधार विधवा महिलांच्या मुलीच्या विवाहासाठी ६६ जणांना अर्थसाहाय्य देण्यात आलेले आहे. अनाथ निराधार मुलींच्या विवाहासाठी देखील पालिकेकडून अनुदान देण्यात येत असून लाभार्थीला ६५ हजार रुपये अनुदान देण्यात आले आहे.


# वर्षाच्या पहिल्याच दिवशी मध्य रेल्वेचा खोळंबा



**मुंबई। प्रतिनिधी,**
नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी मध्य रेल्वेचा खोळंबा झाला. त्यामुळे पर्यटक आणि प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. पुणे झ्र मुंबई डेक्कन क्वीन एक्स्प्रेसमध्ये सोमवारी सकाळी तांत्रिक बिघाड झाल्याने इतर रेल्वेगाड्याच्या वेळापत्रकावर परिणाम झाला. तसेच कसारा, कर्जतवरून सीएसएमटी दिशेकडे जाणाऱ्या लोकलचे वेळापत्रकही विस्कळीत झाले होते. नववर्षानिमित्ताने मुंबईत फिरायला आलेल्या आणि दररोज रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना सोमवारी मध्य रेल्वेच्या लेटलतीफ कारभाराला सामोरे जावे लागले. सकाळपासून लोकल सेवा विलंबाने धावत होत्या. त्यातच ब्रेक बायडिंग झाल्याने पुणे - मुंबई डेक्कन क्वीन एक्स्प्रेसचा २० मिनिटे खोळंबा झाला. एकाच वेळी दोन डब्यांना ब्रेक बायडिंग झाल्याने दुरुस्ती करण्यासाठी अधिक कालावधी लागला. त्याचा इतर रेल्वेगाड्यांच्या वेळापत्रकावर परिणाम झाला. विलंबाने धावत असलेल्या लांबपल्ल्याच्या रेल्वेगाड्यांचा फटका लोकललाही बसला. दुपारच्या सुमारास लोकल २० ते २५ मिनिटे विलंबाने धावत होत्या. त्यामुळे लोकलमध्ये प्रवाशांची प्रचंड गर्दी होती.

# नववर्षाच्या पहिल्या दिवशी दर्शनासाठी गर्दी; पुण्याच्या मध्यभागातील वाहतुकीचा बोजवारा

**पुणे। प्रतिनिधी,**
नववर्षाच्या पहिल्या दिवशी शहर आणि उपनगरातील नागरिकांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात गर्दी केली. मध्यभागातील श्री छत्रपती शिवाजी रस्ता वाहतुकीस बंद ठेवण्यात आला होता. शिवाजी रस्ता वाहतुकीस बंद ठेवल्याने मध्यभागातील वाहतुकीचा बोजवारा उडाला. शिवाजी रस्त्यालगतच्या गल्ली बोळात भाविकांनी बेशिस्तपणे वाहने लावल्याने कोंडीत भर पडली. दर्शनासाठी आलेल्या भाविकांना गर्दीत अडकून पडावे लागल्याने



मनस्ताप सहन करावा लागला.

देवदर्शन करून नववर्षाचे स्वागत करण्याच्या परंपरेनुसार सोमवारी पहाटेपासून श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी झाली होती. दर्शनासाठी आलेल्या नागरिकांनी आपली दुचाकी वाहने जवळपासच्या रस्त्यांवर आणि गल्लीबोळात लावली होती. आधीच अरुंद असलेले रस्ते वाहनांच्या गर्दीने वाहतुकीसाठी उरलेच नाहीत. परिणामी शिवाजी रस्ता, बाजीराव रस्ता, अप्पा बळवंत चौक आणि मध्यवर्ती भागात प्रचंड वाहतूक कोंडी झाली. नववर्षाच्या पहिल्या दिवशी दर्शनासाठी गर्दी होत असल्याने वाहतूक पोलिसांनी मध्यभागातील शिवाजी रस्ता, अप्पा बळवंत चौक ते बुधवार पेठेतील हुतात्मा रस्ता, गणेश रस्ता वाहतुकीस बंद ठेवला होता. सोमवारी सकाळपासून भाविकांची दर्शनासाठी गर्दी झाली होती. भाविकांनी त्यांच्या मोटारी रस्त्यावर बेशिस्तपणे लावल्या होत्या. दुचाकी गल्ली बोळात लावल्याने वाहनांना वाट काढणे अवघड झाले होते.

# सिलेंडरच्या लिकेजमुळे रात्रभर गॅस दुकानात जमा, सकाळी मालकानं लाईट चालू करताच भडका उडाला अन्...



**नाशिक। प्रतिनिधी,**
नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी नाशिक शहरात दुःखद घटना घडली आहे. इंदिरानगर भागातील कलानगर येथे आज सकाळच्या सुमारास एलपीजी सिलिंडरचा स्फोट झाला आहे. वक्रतुंड या पार्सल पॉइंट शॉपमध्ये गॅसच्या भडकेने हा स्फोट झाल्याची माहिती मिळाली आहे. या घटनेत पार्सल पॉइंट चालक आणि एक कर्मचारी असे दोन जण जखमी झाले आहे. या दोघांना तात्काळखाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहे.

घटनास्थळी पोलीस आणि श्वान पथक देखील दाखल झाले असून ह्या घटनेचे नेमके कारण काय, याचा तपास केला जात आहे. मात्र या घटनेबाबत मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, गॅस सिलेंडरच्या लिकेजमुळे रात्रभर गॅस या पार्सल पॉईंटच्या दुकानात जमा झाला. आज सकाळी दुकानाचे मालक आणि कर्मचारी येताच त्यांनी पार्सल पॉईंट या दुकानाचे सेंटर उघडून लाईटचे बटन चालू केले. त्यामुळे याचा भडका झाला आणि भीषण असा स्फोट झाला. दरम्यान या घटनेत या पार्सल पॉईंटचे मालक आणि एक कर्मचारी हे गंभीररित्या भाजले असून त्यांना परिसरातील नागरिकांनी तात्काळ जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचाराकरिता दाखल केले आहे.

या घटनेत ते साठ टक्क्यांहून अधिक भाजल्याची माहिती देखील मिळाली आहे. या घटनेत पार्सल पॉइंटचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून त्या स्फोटाच्या तीव्रतेने पार्सल पॉईंटमधील साहित्य हे रस्त्यावर उडाले. या स्फोटाच्या घटनेने परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ भीतीचं वातावरण पसरलं होतं. घटनास्थळावर बघ्यांची देखील मोठ्या प्रमाणात गर्दी जमली होती. गॅस सिलेंडरच्या कंपनीकडून देखील या ठिकाणी पंचनामा करण्यात आला आहे.

# धुळे जिल्हा पोलीस अधीक्षकांचा नववर्षाच्या पहिल्याच दिवशी दणका



**धुळे। प्रतिनिधी,**
धुळे जिल्ह्यातील गुन्हेगारी नियंत्रित करण्यासाठी पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी कठोर पाऊले उचलण्यास सुरुवात केली असून नववर्षाच्या पहिल्याच दिवशी सात कामचुकार अंमलदारांना निलंबित केले आहे. निलंबित करण्यात आलेल्या अंमलदारांमध्ये साक्री येथील प्रदीप ठाकरे, राकेश बोरसे, मुक्ता वळवी, विनोद गांगुर्डे आणि किशोर पारधी अशा पाच जणांचा समावेश आहे. याशिवाय नियंत्रण कक्षातील महेंद्र ठाकूर आणि मोटारवाहन विभागाचे अमोल भामरे यांनाही सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. धिवरे यांनी जिल्हा अधीक्षक पदाचा कार्यभार हाती घेतल्यानंतर विद्यमान पोलीस अधिकारी, ठाणे अंमलदार आणि प्रशासकीय कामकाज पाहणार्‍या जवळपास सर्वांच्याच कार्यपध्दतीची त्यांच्या विशिष्ट पद्धतीने माहिती घेतली. यानंतर जिल्ह्याच्या दृष्टीने संवेदनशील असलेल्या ठिकाणी लक्ष केंद्रीत करुन नाकाबंदी करण्याचे आदेश दिले. नाकाबंदी कालावधीतच दंगाविरोधी पथकातील काही अंमलदार अतिमहत्वाच्या बंदोबस्तात गैरहजर असल्याचे उघड झाले. काही अंमलदारांशी वरिष्ठ अधिकार्‍यांनी बिनतारी संदेशाव्दारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी बेपर्वाई केली. वरिष्ठांची परवानगी न घेता ते कर्तव्यावर गैरहजर राहिल्याचे उघडकीस आले.

# काळाघोडा महोत्सवाच्या धर्तीवर बीकेसीत भरणार कला महोत्सव



**मुंबई। प्रतिनिधी,**
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) काळाघोडा महोत्सवाच्या धर्तीवर महोत्सवाचे आयोजन करता यावे यासाठी वांद्रे-कुर्ला संकुल येथे बीकेसी आर्ट प्लाझा उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पाच काम वेगाने सुरू असून सन २०२४ च्या अखेरीस या प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे एमएमआरडीएचे नियोजन आहे.

त्यामुळे या वर्षाअखेरीस बीकेसीमध्ये कला महोत्सव, प्रदर्शनांचे आयोजन करणे शक्य होणार आहे.

आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक केंद्र अशी बीकेसीची ओळख आहे. या आर्थिक केंद्रात काळाघोडाच्या धर्तीवर महोत्सव, प्रदर्शन भरवता यावे, परिषदांचे आयोजन करता यावे यासाठी एमएमआरडीने बीकेसी आर्ट प्लाझा (कला केंद्र) विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार कालानगर उड्डाणपुलाजवळील नंदादीप उद्यानाच्या दक्षिण दिशेला हे कला केंद्र विकसित करण्यात येत आहे. सुमारे १०५४५.३२ चौरस मीटर क्षेत्रफळाच्या भूखंडावर हे कला केंद्र उभारण्यात येत आहे. या कला केंद्रात एक रंगमच आणि १०० व्यक्तींसाठी आसन व्यवस्था आदी सुविधांचा समावेश आहे. त्याचबरोबर कलाशिल्प, फुलझाडांनी हे कला केंद्र सजणार आहे. येथे येणारे पर्यटक, मुंबईकरांसाठी खानपान, वाहनतळ, वायफाय, प्रसाधनगृह आदी सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत.

या कला केंद्राचे काम सन २०२४ च्या अखेरीस पूर्ण करून या प्रकल्पाचे लोकार्पण करण्याचे एमएमआरडीएचे नियोजन आहे. त्यामुळे या वर्षाअखेरीस येथे कला महोत्सवाचे आयोजन करणे शक्य होणार आहे. दरम्यान, हे कला केंद्र वांद्रे रेल्वे स्थानकापासून सुमारे ८५० मीटर अंतरावर आहे. तर अंधेरी पश्चिम - मंडाळे मेट्रो २ ब तसेच कुलाबा - वांद्रे - सिप्झ मेट्रो ३ मार्गिकांवरील स्थानके या प्रकल्पापासून नजीक आहे. त्यामुळे या कला केंद्रात पोहचणे पर्यटक, नागरिकांना सोपे होणार आहे.

# नाशिक विभागात लाचलुचपत प्रतिबंधकचे १६१ सापळे, २३५ लाचखोरांवर कारवाई



**नाशिक। प्रतिनिधी,**
लाचलुचपत प्रतिबंधकच्या नाशिक विभागाने २०२३ या वर्षात एकूण १६१ सापळे रचून २३५ लोकसेवकांवर कारवाई केली आहे. नाशिक जिल्ह्यात ६२, अहमदनगर ३४, धुळे १८, नंदुरबार १५ आणि जळगाव ३२ याप्रमाणे सापळे रचण्यात आले. वर्षभरात महसूल विभागात ३५, पोलीस ३०, जिल्हा परिषद १५, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी १०, सहकार आठ, पंचायत समिती सात, भूमीअभिलेख सात, याप्रमाणे विविध विभागातील कारवाईची संख्या आहे. महत्वाच्या सापळ्यांमध्ये भूमी अभिलेखमधील जिल्हा अधीक्षक महेश शिंदे आणि लिपिकास ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना केलेली कारवाई, सिन्नरचा सहायक निबंधक रणजित पाटील, लिपिक वीरनारायण यांना २० लाख रुपयांची लाच स्वीकारताना झालेली अटक, शिक्षणाधिकारी सुनीता धनगर यांना ५५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना अटक, यांचा उल्लेख करावा लागेल. पोलीस निरीक्षक स्वप्नील राजपूत आणि पथकाने नगर भागात विद्युत महामंडळाचा सहायक अभियंता अमित गायकवाड आणि तत्कालीन उपविभागीय अभियंता गणेश वाघ यांना एक कोटीची लाच स्वीकारतांना अटक केली.

# देव दर्शनासाठी जाताना काळाचा घाला, भीषण अपघातात एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू

**अहमदनगर। प्रतिनिधी,**
नवीन वर्षाची सुरुवात प्रत्येक जण धूमधडाक्यात करत असतो पण कधी नवीन वर्षाच्या पूर्व संध्येला अशा काही घटना घडतात की, आपलं मन हेलावून जातं. अशीच एक दुःखद घटना घडली आहे. देव दर्शनाला आले असता एका सुमोचा भीषण अपघात झाला. यात एकाच कुटुंबातील तीन जण ठार झाले तर सात जण जख्मी झाल्याची घटना घडली आहे. श्रीगोंदा तालुक्यातील घारगाव परिसरात नगर दौंड महामार्गावरील इंडियन ऑईल पेट्रोल पंपासमोर काल रविवारी सीएनजी गॅस वाहतूक करणारा टेम्पो आणि महिंद्रा क्झायलो या दोन चारचाकी गाड्यांची समोरासमोर भीषण धडक झाली. या भीषण धडकेत



दोन मुलांसह एकाचा जागीच मृत्यू झाला, तर सात जण गंभीर जखमी झाले. शेहबाज अजिज शेख (३०), गाझी रउफ शेख (१३), लुझेन शोएब शेख (१३) अशी तिन्ही मृत्यूमुखी पडलेल्या तिघांची नावे आहेत. तर रिजवाना अजिज शेख (५७), रिम शोएब शेख (३२), फायजा शोएब शेख (९), शादिन शोएब शेख (११), सना अब्दुल रौफ शेख (३७), अब्दुल रहीम शेख (८), मदिहा शेहबाज शेख (२७) असे जखमी झालेल्यांची नावे असून सर्वजण बैलबाजार, कल्याण पश्चिम, जिल्हा ठाणे येथील रहिवासी आहेत.

अपघाताबाबत मिळालेल्या माहितीनुसार कल्याण येथील रहिवासी असलेले शेख कुटुंबीय बेलवंडी फाटा मार्गे नवीन वर्षाच्या सुरुवातीला कोळगाव येथील कोळगाववाले बाबांच्या दर्ग्यामध्ये दर्शनासाठी महिंद्रा क्झायलो क्र. एमएच ०४ ईडी ७१६ मधून येत होते. घारगाव परिसरात नगर दौंड महामार्गावरील इंडियन ऑईल पेट्रोल पंपासमोर वाहनांना ओव्हरटेक करण्याच्या नादात समोरून भरधाव वेगाने नगर कडून दौंडकडे सीएनजी गॅस वाहतूक करणारा टेम्पो क्र. एचआर ५५ एपी ९९६४ सोबत समोरासमोर भीषण धडक झाली.

या भीषण धडकेत शेहबाज अजिज शेख यांचा जागीच मृत्यू झाला तर गाझी रउफ शेख, लुझेन शोएब शेख या दोन लहान मुलांचा उपचारासाठी दवाखान्यात नेत असताना मृत्यू झाला. तर सात जणांना गंभीर जखमी झाल्याने नगर येथील दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

# देशी बनावटीचे पिस्तुल आणि जिवंत काडतूस बाळगणाऱ्या तरुणाला पोलिसांनी केली अटक



**मुंबई। प्रतिनिधी,**
देशी बनावटीचे पिस्तुलासह जिवंत काडतूस बाळगणाऱ्या तरुणाला पनवेल तालुका पोलिसांनी कोन गाव येथील इंडिया बुल्स इमारतीच्या आवारातून अटक केली आहे. रजनिशराज सत्येंद्रकुवर सिंग (१९) असे या तरुणाचे नाव असून पिस्तूल कशासाठी आणले होते, याबाबत अधिक चौकशी केली जात आहे.

पनवेलमधील कोन गाव येथील इंडिया बुल्स इमारतीत राहणारा तरुण बेकायदेशीर पिस्तूल बाळगत असल्याची माहिती पनवेल तालुका पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांच्या पथकाने कोन गाव येथे सापळा लावला होता. यावेळी रजनिशराज सिंग हा संशयास्पदरीत्या वावरत असताना पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. यावेळी घेतलेल्या झडतीत त्याच्याजवळ देशी बनावटीचे पिस्तूल व चार जिवंत काडतूस आढळून आली आहेत. याबाबत त्याच्याकडे चौकशी केली असता, त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे पनवेल तालुका पोलिसांनी बेकायदा पिस्तूल बाळगल्याप्रकरणी भारतीय हत्यार कायदा तसेच महाराष्ट्र पोलिस अधिनियमानुसार त्याला अटक केली आहे.